**<u>सामनेवाला यांचा उलटतपास : अर्जदारातर्फे श्री. एस. एस. विद्वांस वकील यांच्यामार्फत शपथेवर सुरू :</u>**

1. माझे एमबीए शिक्षण झालेले आहे. मी ऑगस्ट 2010 पासून सामनेवाला कॉर्पोरेशनमध्ये नोकरीस आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी संभाजीनगर संचलन व सुव्यवस्था मंडळ संभाजीनगर चा मी सर्व एचआर विभागाचा व्यवस्थापक आहे. माझे व्यवस्थापक या पदावरती वरिष्ठ सहायक महाव्यवस्थापक हे पद आहे.

2. हे म्हणणे खरे आहे की, सर्व कर्मचा-यांचे कामाचे तास निश्चीत करणे पगाराचे दिवस निश्चीत करणे, सुटट्यांचे नियमन करणे, अवैध सुटट्याबाबत पगार कपात करणे ही सर्व कामे रेकॉर्डप्रमाणे त्या विभागाचे उपव्यवस्थापक हे करतात. व्यवस्थापक म्हणून विभागांच्या कामावर देखरेख ठेवणे, प्रलंबीत तक्रार अथवा प्रकरणाबाबत न्यायालयामध्ये त्याबाबत पाठपुरावा करतो.

3. हे म्हणणे खरे आहे की, मी तक्रारदार यांच्या कागदपत्रानुसार सर्व माहिती घेतलेली आहे. साक्षीदारास उलटतपासामध्ये **<u>नि. सी–17</u>** वरील सामनेवाला यांनी दाखल केलेल्या सर्व्हिस बुकचे पान क्र. 1 ते 98 दाखवण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, **<u>नि. सी–17</u>** वरील सर्व्हिस बुक पान क्र. 1 ते 98 आमच्या कार्यालयाच्या नोंदीप्रमाणे बरोबर आहे. त्यास **<u>नि. सी–29 एकत्रीतपणे</u>** देण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, तक्रारदार हे दि. 31/07/2011 रोजी सेवानिवृत्त झालेले आहेत. तक्रारदार यांच्याविरूध्द 31/07/2011 नंतर सेवानिवृत्तीनंतर कोणतीही कारवाई चौकशी अथवा शिस्तभंगाची कारवाई झालेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, ओव्हरटाईम रजिस्टर पान क्र. 76 ते 98 **<u>नि. सी–29</u>** प्रमाणे जुलै 2005 ते फेब्रुवारी 2010 या कालावधीकरिता एकूण ओव्हरटाईम अवर्स नमूद केलेले आहेत ज्यापैकी प्रत्येक महिन्याला 75 तास प्रतिमहा एवढा ओव्हरटाईमचा पगार दिलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, ओव्हरटाईम रजिस्टरप्रमाणे जुलै 2005 ते फेब्रुवारी 2010 या संपुर्ण कालावधीमध्ये 75 तासांच्या ओव्हरटाईमव्यतिरिक्त केलेल्या ओव्हरटाईमचा अतिकालिक भत्ता दिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, **<u>नि. यु–27</u>** वरील दि. 26/06/2000 मधील परिपत्रकाप्रमाणे

निर्देश क्र. 3 प्रमाणे अर्जदार हे चालक असल्यामुळे निर्देश क्र. 3 या श्रेणीमध्ये मोडतात. हे म्हणणे खरे नाही की, **<u>नि. यु–27</u>** वरील अ.क्र. 3 निर्देशाप्रमाणे अर्जदार हे चालक या संज्ञेमध्ये मोडत असल्यामुळे 75 तासाचे ओव्हरटाईमबाबतचे बंधन अर्जदार यांचे पदास लागू होत नाही. कर्मचारी सेवा विनियमचे अनुषंगाने चालकाचे ओव्हरटाईमचे कामाचे तास 75 तासाची मर्यादा ठेवण्याबाबत नमूद केलेले आहे. कर्मचारी सेवा विनियमचे नियम सामनेवाला कॉर्पोरेशनने स्वतंत्र बनवलेले आहेत.

**<u>साक्षीदाराचा उलटतपास साक्षीदाराने कर्मचारी सेवा विनियम चे पुस्तक दाखल करण्यासाठी पुढील तारखेपर्यंत तहकूब.</u>**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

Digitally signed by DATTATRAY SHANKARRAO KHEDEKAR
Date: 2025.11.19 11:47:37 +0530

**(द.शं.खेडेकर)**
न्यायाधीश,
कामगार न्यायालय क्र. 1 औरंगाबाद

दिनांक–18/11/2025